# प्रेस नोट

## लातूर जिल्हा चालक पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३

दिनांक ११.०७.२०२४

---

लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील **चालक पोलीस शिपाई** भरती सन २०२२-२०२३ मध्ये शारिरिक मोजमाप, शारिरिक मैदानी चाचणीत व वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणीत उत्तीर्ण होवुन लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा हि दिनांक १४.०७.२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा. पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव, लातूर या ठिकाणी घेण्यात येणार आहे. त्यासाठी उमेदवारांनी दिनांक १४.०७.२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव, लातूर या ठिकाणी वेळेत हजर रहायचे आहे. वेळेनंतरने उशिराने येणारे उमेदवारांना लेखी चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**-:: उमेदवारांना सुचना ::-**

१. **उमेदवारांनी लेखी चाचणीसाठी येताना स्वत:चे प्रवेशपत्र (Hall Ticket) सोबत घेऊन यावे.**
२. **ओळखपत्र (उदा.आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसेंस इ.) सोबत घेऊन यावे.**
३. **पासपोर्ट साईज ४ फोटो सोबत घेऊन यावे.**
४. **कसल्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साहित्य, मोबाईल, बॅग, किंमती वस्तु घेऊन येण्यास बंदी राहील. आणल्यास ते कोठे ठेवायचे याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहिल.**

लातूर जिल्हा **चालक पोलीस शिपाई** पदासाठीची लेखी चाचणी प्रक्रिया ही सी.सी.टि.व्हि. व व्हिडीओ ग्रॉफी च्या निघराणीखाली अतिशय तटस्थपणे, नि:पक्षपातीपणे व पारदर्शकरित्या घेण्यात येत असून, उमेदवारांने कोणत्याही आमिषास व भुलथापांना बळी पडु नये, कोणाकडुन असे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची बाब पोलीस अधीक्षक, लातूर, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, पोलीस उप अधीक्षक (मुख्या.), लातूर व पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांना तात्काळ कळविण्यात यावी असे लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत आव्हान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | मोबाईल क्रमांक/दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | अपर पोलीस अधीक्षक, लातूर | ९९२३१३२८२७ |
| ०२ | नियंत्रण कक्ष, लातूर | ०२३८२-२४२२९६ |
| ०३ | पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. लातूर | ०२३८२-२४२६७४ |

तसेच **ई-मेल आयडी** sp.latur@mahapolice.gov.in वर सविस्तर आक्षेप नोंदविण्यात यावा.

**(सोमय मुंडे)**
पोलीस अधीक्षक, लातूर

**प्रति,**

**व्यवस्थापक,**
दैनिक ..................................................